**ठळक बातम्या**

- नोकरी - व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी विशेष सुरक्षेची गरज असून, केंद्र सरकारच्या नवीन कायद्यात यासाठी अधिक कडक शिक्षेची तरतूद असेल, असं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत प्रतिपादन

- वंदे मातरमच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवावर राज्यसभेत चर्चेला प्रारंभ

- इंडिगो कंपनीने नियमित विमान उड्डाणांच्या संख्येत पाच टक्के कपात करावी असे डीजीसीए चे निर्देश

- भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका पाच सामन्यांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज ओदिशात कटक इथं होणार

आणि

- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ

<><><><><>

नोकरी - व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी विशेष सुरक्षेची गरज असून, केंद्र सरकारच्या नवीन कायद्यात यासाठी अधिक कडक शिक्षेची तरतूद असेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. सातारा जिल्ह्यातल्या फलटण इथल्या महिला डॉक्टर आत्महत्येप्रकरणी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. याप्रकरणी महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात विशेष तपास पथकासोबतच न्यायालयीन आयोगही गठीत करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यात इतर मागास प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांसाठी ६५ वसतीगृहं असून इतर जिल्ह्यांमधे वसतीगृहासाठी जागा संपादित केली जात आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली.

राज्यातल्या शाळा, महाविद्यालयांच्या परिसरात पान, तंबाखू, तसंच अंमली पदार्थ मिळण्याच्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असून, कायद्यात बदल करून अशा प्रकरणांमध्ये मकोका लावण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितलं. पान

टपऱ्या उध्वस्त करण्याच्या सूचना सर्व महापालिका, नगरपालिकांना देण्यात आल्या असल्याची माहिती, गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली.

राज्यातल्या सर्व शासकीय कार्यालयांमधे आणि विभागांमधे युनिक डिसॅबिलीटी आयडी कार्ड सादर करणं आजपासून सक्तीचं करण्यात आल्याची माहिती मागासवर्ग आणि बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सभागृहात दिली.

जळगाव जिल्ह्यातल्या कोथळी येथील संत मुक्ताई मंदिर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शिखर समितीकडे पाठवल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. एकनाथ खडसे यांनी यासंदर्भातला प्रश्न विचारला होता.

विधिमंडळ हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी सकाळी विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून आंदोलन केलं. कर्जमाफीचं आश्वासन देऊनही शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही, सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झाली नाहीत, कापसावरील आयात कर शून्य करून परदेशातील कापूस देशात आयात केला जात आहे, अशी टीका विरोधकांनी केली. राज्यात दिवसाला ८ शेतकरी आत्महत्या करत असून सरकारचं धोरण शेतकरीविरोधी आहे, अशी टीका करत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी केली.

हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीनं, राज्यातल्या विद्यापीठाच्या राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ५१वा संसदीय अभ्यास वर्ग आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज या अभ्यास वर्गाचं उद्घाटन झालं. प्रत्यक्ष लोकशाहीची व्यवस्था चालते, हे समजून घेण्यासाठी हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त असल्याचं मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलं….

**- - होल्ड - बाईट- मुख्यमंत्री - -**

**- <><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज राज्यसभेत वंदे मातरम या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्तच्या चर्चेला सुरुवात केली. देशभक्ती, त्याग आणि राष्ट्रीय चेतना जागवणाऱ्या या गीतानं देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामाची दिशा निश्चित केली, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. स्वातंत्र्यलढ्याच्या वेळीही या गीताची गरज होती, आजही

आहे, आणि २०४७मध्ये भारत विकसित देश होईल, तेव्हाही लागेल, असं मत त्यांनी मांडलं.

राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनीही या चर्चेत आपले विचार मांडले. स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी वंदे मातरम हा नारा काँग्रेसनं दिला, महात्मा गांधींच्या असहकार चळवळीत भाग घेऊन लाखो स्वातंत्र्यसैनिकांनी वंदे मातरम ही घोषणा देत कारावास भोगला, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

**<><><><><>**

डाव्या कट्टरतावादाच्या विरोधात सरकारनं कठोर धोरण अवलंबलं असून पुढच्या मार्चपर्यंत त्याचं समूळ उच्चाटन करायचं ध्येय ठेवलं आहे. असा पुनरुच्चार सरकारनं आज केला. ही समस्या सोडवण्यासाठी केंद्र सरकार, राज्यांसोबत काम करत आहे, असं प्रतिपादन गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात केलं. यासाठी राज्यांना सीएपीएफच्या तुकड्या पुरवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. तसंच, पुरेशा प्रशिक्षण सोयीसुविधा आणि ७०६ पोलीस स्थानकांच्या उभारणीला मान्यता दिल्याचंही राय यांनी सांगितलं.

देशातलं अन्नधान्य उत्पादन यंदा ३५ कोटी ७ लाख टनांवर जाईल असा अंदाज असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी लोकसभेत दिली.

**<><><><><>**

देशातली नागरी हवाई सेवा झपाट्यानं पूर्वपदावर आणली जात आहे असं स्पष्टीकरण केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री के राम मोहन नायडू यांनी आज  लोकसभेत सांगितलं. विमानसेवेतल्या अनियमितेबाबत केंद्रीय हवाई वाहतूक संचालनालयानं इंडिगो कंपनीला नोटीस बजावली आहे, कंपनीच्या खुलाशानंतर योग्य आणि कडक कारवाई केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. प्रवाशांची सेवा आणि सुरक्षा याला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या दृष्टीनं नागरी हवाई वाहतूक नियमात बदल केले जातील, असं ते म्हणाले. प्रवाशांना पुढच्या बुकींगसाठी शुल्क आकारलं नसून आतापर्यंत साडेसातशे कोटींहून जास्त परतावा देण्यात आल्याचं  त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

इंडिगो कंपनीची विमानउड्डाणं रद्द झाल्यानंतर नागरी हवाईसेवेत झालेल्या खोळंब्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय हवाई वाहतूक संचालनालयानं इंडीगो विमान कंपनीनं नियमित विमान उड्डाणांच्या संख्येत पाच टक्के कपात करण्याचे निर्देश दिले आहेत. विशेषतः अधिक मागणी आणि अधिक वारंवारता असलेल्या उड्डाणांसाठी हे निर्बंध लागू होतील असं संचालनालयानं म्हटलं आहे. हवाई वाहतुकीसंबधित विभागानं कंपनीला उद्या संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सुधारित वेळापत्रक दाखल करायला सांगितलं आहे.

देशातल्या विमानउड्डाणांची सद्यस्थिती आणि प्रवाशांशी संबधित सेवांबाबतचा आढावा घेण्यासाठी विमानतळांना प्रत्यक्ष भेट देण्याचे निर्देश नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं वरिष्ठ अधिकाऱ्यांना आज दिले. नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू यांनी घेतलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत हे निर्देश देण्यात आले.

नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाचे संयुक्त सचिव मधुसूदन शंकर यांनी आज मुंबई विमानतळ टर्मिनल २ इथं भेट देऊन इंडिगोच्या विमानसेवेतल्या अनियमिततेने उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. विमानतळावरची गर्दी कमी करण्यासाठी प्रवाशांना आता सहा तास आधी त्यांच्या विमानाच्या उड्डाणाबाबातची माहिती दिली जात आहे असं त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

रेल्वे आणि जलशक्ती राज्यमंत्री व्ही. सोमण्णा यांनी आज नवी दिल्ली इथून नव्या तिरूपती-साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेगाडीचा दूरस्थ पद्धतीनं प्रारंभ केला. आंध्र प्रदेशचे रस्ते, इमारती आणि पायाभूत सुविधा मंत्री बी. सी. जनार्दन रेड्डी यांनी तिरूपती रेल्वेस्थानकावरून या गाडीला हिरवा झेंडा दाखवला.

**<><><><><>**

भारत विरुद्ध  दक्षिण आफ्रिका पाच सामन्यांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. सलामीचा सामना आज संध्याकाळी सात वाजता ओडिशातल्या कटक इथल्या बाराबती मैदानावर खेळण्यात येणार आहे. यामालिकेतील दुसरा सामना गुरुवारी चंदीगडच्या मुल्लानपूर इथं तर तिसरा सामना धर्मशाळा इथं, चौथा सामना लखनऊमध्ये आणि शेवटचा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी मैदानावर होईल.

**<><><><><>**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, ज्येष्ठ नेते शरद पवार, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे.

बाबा आढाव यांना आदरांजली वाहण्यासाठी पुणे कृषी उत्पादन बाजार समितीतला फळे आणि भाजीपाला विभाग उद्या बंद ठेवण्यात येणार आहे.

बाबा आढाव यांचं काल पुण्यात वार्धक्यानं निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. त्यांचा पार्थिव देह आज अंत्यदर्शनासाठी पुण्यात हमाल भवन इथं ठेवण्यात आला असून संध्याकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येतील.

//<><><><><>//